**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय

मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑगस्ट २०१८

## अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस-०८१३/प्र.क्र.३४६/राउशु-३.—ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिताचे पुढील नियम तात्काळ प्रभावाने अंमलात आणले पाहिजेत, आणि म्हणून, हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५ वा ) याच्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनाला वाटते.

त्याअर्थी आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५ वा ) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ह१) च्या उपखंड (दोन) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना नियम " मुंबई विदेशी मद्य (पहिली सुधारणा) नियम, २०१८" असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम ३ मध्ये, खंड (६) च्या उपखंड (ड) ऐवजी पुढील उपखंड दाखल करण्यात येईल :—

" (ड) " सौम्य मद्य " याचा अर्थ,

(अ) सौम्य मद्य-अ :—

(एक) सौम्य बिअर, जिच्यामध्ये ५% v/v पेक्षा अधिक नसेल एवढी, जी प्रुफ स्पिरीटच्या ८.७५% प्रमाणाशी समतुल्य असेल, इतकी मद्यार्काची तीव्रता आहे ;

(दोन) सौम्य बिअर व्यतिरिक्त कोणतेही विदेशी मद्य ज्यामध्ये ५% v/vपेक्षा अधिक नसेल एवढी, जी प्रुफ स्पिरीटच्या ८.७५%, प्रमाणाशी समतुल्य असेल, इतकी मद्यार्काची तीव्रता आहे ;

(ब) सौम्य मद्य-ब :— किण्वित मद्याखेरीज अन्य कोणतेही विदेशी मद्य, ज्यामध्ये ५% v/v पेक्षा अधिक असेल अशी म्हणजेच प्रुफ स्पिरीटच्या ८.७५% प्रमाणाशी समतुल्य आहे, परंतु ८% v/v पेक्षा अधिक नसेल म्हणजेच प्रुफ स्पिरीटच्या १४% प्रमाणाशी समतुल्य आहे, इतकी मद्यार्काची तीव्रता असा आहे ;"

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सह सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st August 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS-0813/C.R.346/EXC-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force with immediate effect and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause (*ii*) of clause (*h1*) of sub-section *(2)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act, and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953 as follows, namely :–

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor Rules, 1953 (First Amendment) Rules, 2018.

2. In rule 3 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953, in clause (6), for sub-clause (*d*), the following sub-clause shall be substituted, namely :–

"(*d*) "mild liquor" means,–

*(A)* Mild Liquor-A.–

(*i*) mild beer having alcoholic strength not exceeding 5% v/v which is equivalent to 8.75% of proof spirit ;

(*ii*) any foreign liquor other than mild beer having alcoholic strength not exceeding 5% v/v which is equivalent to 8.75% of proof spirit ;

*(B)* Mild Liquor-B. – any foreign liquor other than fermented liquor having alcoholic strength exceeding 5% v/v which is equivalent to 8.75% of proof spirit but not exceeding 8% v/v which is equivalent to 14% of proof spirit ;"

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.